22-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/21/2025 10:23 PM Page 1



# फुफ्फुसाच्या कर्करोग निदानासाठी सामंजस्य करार

## फुफ्फुसाच्या कर्करोगासाठी सर्व रुग्णांची तपासणी अनिवार्य केली जाणार



■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २१ :** गोवा आरोग्य सेवा संचालनालयाने ( डीएचएस ) फुफ्फुसाच्या कर्करोगाचे लवकर निदान आणि उपचार प्रक्रिया सुधारण्यासाठी ' ॲस्ट्रा झेनेका' आणि 'क्यूरे .एआय ' यांच्यासोबत भागीदारीचा विस्तार केला आहे. आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली असून, या उपक्रमाचा कालावधी दोन वर्षांसाठी वाढवण्यात आला आहे.

जून २०२४ मध्ये सुरू झालेल्या या कार्यक्रमांतर्गत फुफ्फुसाच्या कर्करोगाचे संभाव्य लक्षणे शोधण्यासाठी ' क्यूरे .एआय ' च्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून छातीचा एक्स–रे तपासला जातो. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत १७ डीएचएस केंद्रांमध्ये ३३ हजार ८०० हून अधिक एक्स–रे तपासले गेले असून, त्यामध्ये ३ हजार १४४ संशयित नोड्यूल आढळले आहेत. त्यातील १४३ प्रकरणे उच्च–जोखमीच्या गटात वर्गीकृत करण्यात आली आहेत.

कार्यक्रमाच्या प्रभावी रेफरल यंत्रणेद्वारे आतापर्यंत फुफ्फुसाचा कर्करोग झालेला एक रुग्ण आढळला आहे. या निदान प्रक्रियेत डॉक्टरांचे पुनरावलोकन, सीटी स्कॅन आणि बायोप्सी यांचा समावेश करण्यात आला आहे.

आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी या कार्यक्रमाच्या महत्त्वावर प्रकाश टाकताना सांगितले की, कर्करोगाशी संबंधित मृत्यू कमी करण्यासाठी लवकर निदान अत्यंत महत्त्वाचे आहे. एआय –आधारित तंत्रज्ञानाच्या वापरामुळे जलद निदान आणि अचूक रेफरल्स शक्य झाले आहेत. ही भागीदारी गोव्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला आणखी सक्षम बनवेल. सरकारी रुग्णालयांमध्ये एक्स–रे घेणाऱ्या सर्व रुग्णांची आता फुफ्फुसाच्या कर्करोगासाठी अनिवार्य तपासणी केली जाणार आहे.

या कार्यक्रमात विशेष प्रशिक्षित नर्स नेव्हिगेटर्स सहभागी असून, उच्च–जोखीम असलेल्या रुग्णांना तपासणीपासून निदानापर्यंत संपूर्ण फॉलो–अप सेवा पुरवली जात आहे. तसेच, डॉक्टर, तज्ञ आणि निदान केंद्रांचा समावेश असलेले एक मजबूत रेफरल नेटवर्क तयार करण्यात आले आहे. विस्तारित भागीदारी अंतर्गत स्क्रीनिंगचा विस्तार, रुग्णांचे प्रभावी ट्रॅकिंग आणि डीएचएस केंद्रांवरील आरोग्य कर्मचारी यांच्यासाठी नवीन प्रशिक्षण मॉड्यूल्स विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. हा उपक्रम गोव्यातील फुफ्फुसाच्या कर्करोगाच्या लवकर निदानासाठी एक महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. सरकारी आणि खासगी क्षेत्राच्या सहकार्याने तंत्रज्ञानाच्या मदतीने आरोग्यसेवेची गुणवत्ता सुधारण्याचे सरकारचे प्रयत्न अधिक बळकट झाले आहेत.

## निवडक

### धामशेत घरावर झाड पडून मोटे नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड

**वाळपई, दि. २१ :** सत्तरी तालुक्यातील धामशे येथे एका घरावर फणसाचे झाड पडले. यात घराचे छप्पर आणि काही प्रमाणात भिंतींचे नुकसान झाले. यात घरातील दीड वर्षीय चिमूकल्याच्या पायाला देखील दुखापत झाली आहे. दरम्यान ग्रामस्थांनी वाळपई अग्निशामक दलास याबाबत माहिती दिली. त्यांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत पाहणी केली. घरात पडलेले झाड हटवण्यात आले. अग्निशामक दलाने दिलेल्या माहितीनुसार या घटनेत घराचे सुमारे ७५ हजार रुपयांचे नुकसान झाले असून, त्यातल्या त्यात अंदाजे ५० झार रुपयांची मालमत्ता वाचण्यात त्यांना यश मिळाले.

--------------------

### चांदर येथे ८५ हजारांचा अमली पदार्थ जप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २१ :** मायणा कुडतरी पोलिसांनी एका कारवाईत ८५ हजारांच्या अमली पदार्थासह दोन जणांना अटक केली. मिळालेल्या माहितीनुसार, मायणा कुडतरी पोलिसांनी दोन जणांना पकडून त्यांच्याकडील ८५ हजारांचा अमली पदार्थ जप्त केला. यानोस मताजी (कुडचडे) आणि परसप्पा तलवार (बीजापूर, कर्नाटक) अशी संशयितांची नावे आहेत. घटनेचा पंचनामा करुन पोलिसांनी त्यांना रीतसर अटक केली. चांदर येथील मोला सायलाभाट येथे पोलिसांनी ही कारवाई केली. संशयित स्वीफ्ट कारमधून आले होते. त्यांच्याकडे ३० हजार रुपये किमतीचे ३ ग्राम हायड्रो गांजा, ३० हजार रुपये किमतीचे ३ ग्राम इस्टसी, २५ हजार रुपये किमतीचे २.५ ग्राम ॲफेटामीना हा अमली पदार्थ जप्त केला. पोलिस निरीक्षक अरुण गावस देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संकेत नाईक पुढील तपास करत आहेत.

# पाण्याचे शुक्लकाष्ट संपेनाच..!

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ फोंड्यात तीव्र पाणीटंचाई; नागरिकांची प्रशासनाकडे धाव

**फोंडा, दि. २१ :** उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे फोंड्यातील अनेक भागांत पाणीटंचाई तीव्र झाली आहे. पाणीपुरवठ्यातील विसंगतीमुळे हैराण झालेल्या रहिवाशांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) कार्यालयात धाव घेतली आहे. सहाय्यक अभियंता (एई) आणि त्यांच्या पथकाने काही भागांतील समस्या सोडवल्या असल्या, तरी कुर्टी येथील प्रभुनगर परिसरातील नागरिक १२ दिवसांपासून अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे त्रस्त आहेत. विशेष म्हणजे, फोंड्यात दोन मोठे जलशुद्धीकरण प्रकल्प असूनही, येथील नागरिकांना अशा समस्यांचा सामना करावा लागत आहे.

१३ मार्च रोजी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे (एमजीपी) नेते डॉ. केतन भाटीकर यांच्या नेतृत्वाखाली संतप्त रहिवाशांनी पीडब्ल्यूडी कार्यालयात धडक देत त्वरित उपाययोजनांची मागणी केली होती . नागरिकांनी बाटलीबंद पाणी आणि टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहण्याची वेळ आल्याची तक्रार केली. ही व्यवस्था महागडी आणि अपुरी असल्याचे त्यांनी सांगितले. काही रहिवाशांना घरापासून दूर फोंडा बस स्थानकातील सार्वजनिक शौचालयांचा वापर करावा लागत आहे. परिस्थिती तातडीने सुधारली नाही, तर रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा रहिवाशांनी दिला.

पीडब्ल्यूडीच्या सहाय्यक अभियंता काशिनाथ सराफ यांनी नागरिकांना समस्या लवकरच सोडवण्याचे आश्वासन दिले. मात्र, परिस्थितीत काहीही बदल न झाल्याने रहिवाशांनी १६ मार्च रोजी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पाणीटंचाई हेतुपुरस्सर निर्माण झाल्याचा आरोप करत त्यांनी चौकशीची मागणी केली. त्याच दिवशी, संतप्त रहिवाशांनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या सांखळी येथील निवासस्थानी भेट घेतली. सावंत यांनी सोमवारपर्यंत परिस्थिती सुधारेल असे आश्वासन दिले आणि अधिकाऱ्यांना तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश दिले.

मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतरही नळ कोरडेच राहिल्याने १९ मार्च रोजी भाजप समर्थित नगरसेवक विश्वनाथ दळवी यांच्या नेतृत्वाखाली रहिवाशांनी पुन्हा पीडब्ल्यूडी कार्यालयात जाऊन एई सराफ यांची भेट घेतली. सराफ यांनी माहिती दिली की ८०% पुरवठा समस्या सोडवण्यात आली असून उर्वरित काम दोन दिवसांत पूर्ण होईल. तसेच, पुरवठा लाइनमधील दोष शोधून आवश्यक असल्यास पाइपलाइन बदलण्याचेही प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

राजकीय नेत्यांकडे मदत मागण्याबाबत विचारले असता, रहिवाशांनी स्पष्ट केले की त्यांचा हेतू राजकीय नाही. आम्ही कोणतेही राजकारण करत नाही, आम्हाला फक्त पाणी हवे आहे. जो कोणी मदत करू शकेल, तो आमच्यासाठी स्वागतार्ह आहे, असे त्यांनी सांगितले. फोंड्यातील पाणीटंचाईचा प्रश्न अद्याप पूर्णपणे सुटलेला नसून, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नव्या निर्णयामुळे लोटलीमधील शेतकऱ्यांना न्यायाची आशा ?

## 'खाजन' शेतजमिनी अन्य प्रकारच्या जमिनी म्हणून चिन्हांकित

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. २१ :** मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने नुकत्याच दिलेल्या निर्णयानुसार टाउन अँड कंट्री प्लॅनिंग (टीसीपी ) कायद्याच्या कलम १७ (२) अंतर्गत केलेल्या काही सुधारणा अवैध ठरवल्या आहेत. या पार्श्वभूमीवर लोटली येथील शेतकऱ्यांना आशा आहे की, सरकार त्यांच्या दीर्घकालीन समस्येवर योग्य निर्णय घेईल.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्रादेशिक योजनेत (आरपी २०२१ ) त्यांच्या 'खाजन ' शेतजमिनी चुकीच्या प्रकारे अन्य प्रकारच्या जमिनी म्हणून चिन्हांकित करण्यात आल्या आहेत. परिणामी, सार्वजनिक बांधकाम विभागाला या जमिनींच्या माध्यमातून नवीन बोरी पूल बांधण्याचा प्रस्ताव पुढे नेण्याची संधी मिळाली. योग्य झोनिंग झाल्यास, या जमिनींचे शेतीयोग्य स्वरूप कायम राहिले असते आणि त्यांना विकास प्रकल्पांपासून संरक्षण मिळाले असते.

लोटली मधील कार्बोट, मस्कासाना आणि बेब्दो भाडेकरू संघटनेचे अध्यक्ष अल्बर्ट पिन्हेरो यांनी यासंदर्भात सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ही आरपी २०२१ मधील त्रुटी आहे, जी सरकारने स्वतः दुरुस्त करायला हवी. मात्र, अर्जदारांकडून प्रति चौरस मीटर १ हजार रुपये आकारले जात आहेत. जर चूक प्रशासनाची असेल, तर शेतकऱ्यांनी त्याची किंमत का द्यावी ? असा सवाल त्यांनी केला.

त्यांच्या म्हणण्यानुसार, चुकीच्या झोनिंगमुळे लोटली मधील खाजन शेतकरी अडचणीत सापडले आहेत. आमच्या शेतजमिनी आरपी २०२१ मध्ये खाजन म्हणून नोंदवल्या गेल्या नाहीत. परिणामी, त्या नवीन बोरि पूलासाठी अधिग्रहणासाठी चिन्हांकित केल्या जात आहेत. गोव्याच्या भविष्यासाठी सर्वोत्कृष्ट म्हणून गौरविले जाणारेआरपी २०२१ अशा चुका करत असेल, तर त्याचा पुनर्विचार आवश्यक आहे. कलम १७(२) देखील युक्तिसंगत नाही, असे त्यांनी नमूद केले. तसेच, आरपी २०२१ रद्द करून, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नवीन प्रादेशिक योजना तयार करण्याची मागणी त्यांनी केली. +

शेतकरी संघटनेने टीसीपी विभागाला या त्रुटी सुधारण्यासाठी पत्र दिले होते, मात्र कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. आता कलम १७(२)) अवैध ठरल्यानंतर, शेतकऱ्यांकडे त्यांच्या जमिनीचे पुनर्वर्गीकरण करण्यासाठी कोणताही स्पष्ट पर्याय शिल्लक राहिलेला नाही.

झोनिंगमध्ये सुधारणा करण्यासाठी कलम १७(२) व्यतिरिक्त कोणतीही तरतूद नाही. मात्र, शेतीसाठी प्रति चौरस मीटर ₹१ हजार आकारणे अन्यायकारक आहे. आधीच वाढत्या मजुरीच्या खर्चाने शेतकरी त्रस्त आहेत. याशिवाय, हे शुल्क भरूनही या जमिनी केवळ शेतीसाठीच वापरता येणार आहेत, असे पिन्हेरो यांनी स्पष्ट केले.

हा मुद्दा केवळ खाजन जमिनीपुरता मर्यादित नाही, तर मोरोड शेतजमिनींसाठीही तितकाच गंभीर आहे. अनेक मोरोड शेतजमिनी चुकीच्या प्रकारे वसाहती क्षेत्र म्हणून दर्शविण्यात आल्या आहेत. परिणामी, भूखंड निर्मितीसाठी चालना मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर, लोटली ग्रामसभेने एक ठराव संमत करत अधिकाऱ्यांना आरपी २०२१ वर आधारित झोनिंग प्रमाणपत्रे जारी न करण्याचे निर्देश दिले. याचे कारण म्हणजे प्रादेशिक योजनेतील असंख्य त्रुटी.

पिन्हेरो यांनी आणखी एक विसंगती स्पष्ट केली. काही घरांची मालकी असलेली छोटी भूखंडे १ हजार चौरस मीटरपेक्षा कमी असतानाही त्या बाग क्षेत्र म्हणून दर्शविण्यात आल्या आहेत. वसाहतीमध्ये असलेल्या छोट्या भूखंडांना बाग क्षेत्र कसे म्हणता येईल ? झोनिंगने सातत्यपूर्ण भूभाग व्यापले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

कलम १७(२) वर टीका केली असली, तरी यामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला होता, कारण त्याशिवाय झोनिंग त्रुटी दुरुस्त करण्याचा कोणताही मार्ग नव्हता. मात्र, आता १७(२) अवैध ठरल्याने, शेतकऱ्यांसाठी कोणताही व्यवहार्य मार्ग शिल्लक राहिलेला नाही, असे पिन्हेरो म्हणाले.

लोटली ग्रामस्तरीय समिती आणि ग्रामस्थांनी टीसीपी कार्यालयात दोन स्वतंत्र शिफारसी सादर केल्या आहेत. या शिफारसींमध्ये पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या गरजेवर भर देण्यात आला आहे. झोनिंग सुधारणा अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून कराव्यात तसेच झेडएओ , वन आणि जैवविविधता विभाग यांना या प्रक्रियेत सामील करावे, शेतकऱ्यांना त्रास न होता दुरुस्ती प्रक्रियेला गती द्यावी , मालमत्ता मालकांनी केवळ प्रक्रिया शुल्क भरून आवश्यक सुधारणा अर्ज दाखल करण्याची मुभा द्यावी, योग्य तपासणीसह निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता असावी, ठोस दस्तऐवजांच्या आधारे निर्णय घेतला जावा, तसेच विनंती नाकारल्यास अपील करण्याचा अधिकार दिला जावा अशा प्रकारच्या मागण्या लोटलीमधील शेतकऱ्यांनी केल्या आहेत.

# एप्रिलपासून शैक्षणिक वर्ष सुरू करण्यास पालकांचा विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. २१ :** राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी ) स्वागतार्ह असले तरी येत्या एप्रिलपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षाच्या विरोधात पालकांनी एकत्रित भूमिका घेतली आहे. वाढत्या उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर आणि मानसिक तसेच शारीरिक आरोग्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांसाठी सुट्टीची आवश्यकता असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

शुक्रवारी फोंडामध्ये जमलेल्या पालकांनी सरकारकडे मागणी केली की, उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे आणि परीक्षेनंतरच्या थकव्यामुळे विद्यार्थ्यांना किमान एक ते दीड महिन्यांची विश्रांती मिळावी. शाळा मेच्या मध्यात किंवा जून महिन्याच्या सुरुवातीला सुरू करण्यात याव्यात, जेणेकरून विद्यार्थी ताजेतवाने होऊन नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करू शकतील.

सध्या गोव्यात उष्णतेची तीव्रता वाढत असून, पुढील काही दिवसांत ती अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. शाळांमध्ये वातानुकूलन (एसी) किंवा योग्य वायुवीजन व्यवस्था नसल्याने, विद्यार्थ्यांच्या आरोग्यास मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे एनईपी लागू करण्यास किमान एक वर्षाची मुदत वाढवावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.

पालक मिलिंद सोरेस यांनी स्पष्ट केले की, विद्यार्थ्यांसाठी सुट्टी अत्यंत महत्त्वाची आहे. परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांसोबत पालकांवरही मोठा मानसिक ताण येतो. सरकारने आमच्या विनंतीची दखल घेतली पाहिजे.

डॉ. केतन भाटीकर यांनी सांगितले की, पालक एप्रिलपासून शाळा सुरू होण्याच्या विरोधात आहेत आणि यामागे दोन महत्त्वाची कारणे आहेत . एक म्हणजे वाढती उष्णतेची लाट आणि दुसरे म्हणजे मानसिक आरोग्यासाठी आवश्यक असलेली सुट्टी.

माध्यमिक विद्यार्थ्यांच्या परीक्षा २८ मार्च रोजी संपल्यानंतर लगेचच एप्रिलमध्ये शाळा सुरू करण्याचा निर्णय दुर्दैवी आहे. सध्या गोव्यातील हवामान अत्यंत उष्ण आहे आणि विद्यार्थी तसेच वयोवृद्ध नागरिक उष्णतेच्या लाटेमुळे त्रस्त आहेत. शाळांमध्ये एसी अथवा योग्य वायुवीजन व्यवस्था नाही. त्यामुळे परीक्षेनंतर काही काळाचा ब्रेक देणे आवश्यक आहे.

पालकांच्या मते, परीक्षेच्या तणावानंतर मुलांना आरामाची आवश्यकता आहे. काही पालकांनी आधीच सुट्टीसाठी तिकिटे आरक्षित केली आहेत. त्यामुळे शाळा तत्काळ सुरू झाल्यास त्यांच्या नियोजनावरही परिणाम होईल. शिक्षणात सुधारणा महत्त्वाची आहे, परंतु ती विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम करणार असेल, तर अशा बदलांना विरोध असायलाच हवा. परीक्षा संपल्यानंतर मुलांना सुट्टी मिळणार नाही, हे ऐकून विद्यार्थी निराश आणि मानसिक तणावाखाली आहेत, असेही भाटीकर यांनी सांगितले.

मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि शैक्षणिक अधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष घालून हा निर्णय पुनर्विचारावा, अशी मागणी पालकांनी केली आहे. परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना नवीन कौशल्ये शिकण्यासाठी वेळ मिळावा, विश्रांती घ्यावी आणि मानसिक स्वास्थ्य जपावे, यासाठी शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या तारखेत बदल करावा, अशी पालकांची ठाम भूमिका आहे.

# कोकणीतील निकाल निर्णयाचे अखिल भारतीय कोकणी परिषदेकडून स्वागत

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २१ :** गोव्याची अधिकृत भाषा असलेल्या कोकणीमध्ये निकाल देण्याच्या राज्य माहिती आयोगाच्या निर्णयाचे अखिल भारतीय कोकणी परिषद (एआयकेपी ) ने स्वागत केले आहे. परिषदने हा निर्णय कोकणीच्या संवर्धन आणि प्रचारासाठी महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे म्हटले आहे.

एआयकेपीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात राज्य माहिती आयुक्त आत्माराम बर्वे आणि आयोगाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. परिषदचे कार्यकारी अध्यक्ष चेतन आचार्य यांनी या निर्णयाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की , न्यायालयीन प्रक्रियेत स्थानिक भाषेचा वापर वाढवण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. गोव्यातील जनतेला समजणाऱ्या भाषेत न्याय दिल्यास प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ आणि पारदर्शक होईल.

एआयकेपीने विधानसभेत कोकणीच्या वापराचा उल्लेख करत हे निदर्शनास आणले की राज्य सरकारही हळूहळू कोकणीचा अधिकृत कामकाजात समावेश करत आहे. आचार्य यांनी न्यायालयीन व्यवस्थेत कोकणीचा स्वीकार हा प्रशासनाच्या सर्व स्तरांवर अधिकृत भाषेचा प्रभावी वापर सुनिश्चित करणारे पाऊल असल्याचे अधोरेखित केले.

संघटनेने राज्य माहिती आयोगाला या धोरणाची सातत्याने अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले तसेच अन्य सरकारी विभागांनीही मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि माहिती आयुक्त आत्माराम बर्वे यांनी घालून दिलेल्या दिशानिर्देशांचे पालन करावे, अशी मागणी केली. अधिकृत भाषा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, असे एआयकेपीने म्हटले आहे.

एआयकेपी ने सरकारच्या कोकणी भाषेतील अधिकृत कामकाजाला पाठिंबा दर्शवत आपली बांधिलकी अधोरेखित केली. शासन आणि न्यायप्रक्रियेत कोकणीचा व्यापक वापर होण्यासाठी एआयकेपी कायमच सरकारच्या पाठीशी राहील, असे चेतन आचार्य यांनी स्पष्ट केले.

# आरोग्य केंद्राच्या रखडलेले काम त्वरित पूर्ण करा

## कुळेवासीयांचा आंदोलनाचा इशारा | ६ वर्षांपासून संथगतीने काम सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा , दि. २१ :** कुळे येथील ग्रामीण आरोग्य केंद्राच्या (१० खाटांचे रुग्णालय) दीर्घकाळ रखडलेल्या अपग्रेडेशनच्या कामाच्या त्वरित पूर्णतेसाठी स्थानिक नागरिकांनी सरकारकडे मागणी केली आहे. तब्बल सहा वर्षांपासून हे काम अत्यंत संथगतीने सुरू असून, आवश्यक आरोग्य सेवा मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी, स्थानिक नागरिकांना ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या पोळे येथील रुग्णालयावर अवलंबून राहावे लागत आहे.

स्थानिक रहिवासी वासुदेव गांजेकर यांनी सांगितले की, मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी मागील वर्षी या रुग्णालयाचे काम तीन महिन्यांत पूर्ण होईल असे आश्वासन दिले होते. मात्र, आज एक वर्ष उलटूनही प्रत्यक्षात कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही. किरकोळ आजारांवर उपचार घेण्यासाठी देखील आम्हाला ३० किमी प्रवास करून पिले तिस्क–उसगाव रुग्णालय गाठावे लागते, हे दुर्दैवी आहे.

१९८४ मध्ये स्थापन झालेल्या कुळे ग्रामीण आरोग्य केंद्राची वाढती गरज ओळखून, २०१८ मध्ये या केंद्राच्या अपग्रेडेशनचे काम हाती घेण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर, आरोग्य मंत्री विश्वजीत राणे, आमदार आणि जीएसआयडीसी अध्यक्ष दीपक प्रभू पावसकर तसेच सिद्धार्थ कुंकळ्येकर यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. मात्र, सहा वर्षे उलटूनही काम पूर्णत्वास गेलेले नाही.

कुळे सरपंच गोविंद शिगावकर यांनी सांगितले की, दहा खाटांचे हे रुग्णालय सहा वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत आहे. कंत्राटदारांकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने प्रत्येक ग्रामसभेत नागरिक या कामाच्या त्वरित पूर्णतेची मागणी करत आहेत. या कामाच्या विलंबामुळे धारबांदोडा तालुक्यातील साकोर्डा , कुळे ,मोले आणि काले या चार ग्रामपंचायतींना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः, अपघातग्रस्त रुग्णांसाठी हे आरोग्य केंद्र अत्यंत महत्त्वाचे आहे. मोले–अनमोड मार्गावर अपघात झाल्यास, रुग्णांना ३० किलोमीटर अंतरावरील पिले उसगाव येथे हलवावे लागते, त्यामुळे वेळेत उपचार न मिळण्याचा मोठा धोका आहे.

सरपंच शिगावकर पुढे म्हणाले, जर लवकरच हे काम पूर्ण झाले नाही, तर आम्ही नागरिकांसह रस्त्यावर उतरून आंदोलन करू. गरीब नागरिकांनाही त्वरित आरोग्य सुविधा मिळायला हव्यात. आमदार गणेश गावकर यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करावा, अशी आमची मागणी आहे.

स्थानिकांच्या संतप्त भावना लक्षात घेता, आरोग्य केंद्राच्या अपग्रेडेशनसाठी सरकारकडून त्वरित ठोस कारवाई करण्याची मागणी होत आहे. प्रशासनाने याची दखल घेतली नाही, तर नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात जाण्याची शक्यता आहे.